# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६२०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार EDUTECH E-mail : desk10@dte.org.in Internet www.dte.org.in


---

**अधिसूचना**

क्रमांक : १०/एडीएम/पदविका/२०१३/ ५८५
दिनांक 10 JUL 2013

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये सर्व पदविका अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या मागासवर्गीय उमेदवारांच्या जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्यासाठी हमीपत्र सादर करुन मुदतवाढ देण्याबाबत**

शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण २०११/३२५/तांशि-४ दिनांक २५.०६.२०१२ मधील सुचना विचारात घेऊन मागासवर्गीय विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारित असलेल्या सर्व पदविका अभ्यासक्रमांच्या केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेच्या प्रवेश फेरीमार्फत प्रवेश अलॉट झाल्यानंतर प्रवेश निश्चित करतेवेळी जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य करण्यात आले होते. आता शासनाने शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी जात वैधता प्रमाणपत्र तीन महिन्यात प्राप्त करण्याच्या अधीन राहून प्रवेश देणेबाबत परवानगी दिलेली आहे.

या पार्श्वभुमीवर सदर अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या ज्या मागासवर्गीय उमेदवाराकडे जात वैधता प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीचे वेळी उपलब्ध नसल्यास अशा विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र ३ महिन्यात सादर करण्याबाबतचे रुपये १००/- च्या स्टॅंप पेपरवर हमीपत्र केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश ॲलॉट झालेल्या संस्थेत सादर करावे. हमीपत्राचा नमुना (Proforma 'H') संचालनालयाच्या www.dte.org.in/poly2013 संकेतस्थळावर download विभागात उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

( डॉ. सुभाष महाजन )
प्र.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई

पृष्ठांकन क्र. विताऔ/शिक्षण/जातवै-मु-१५६/६०६
दिनांक :- 13 AUG 2013

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद अधिनस्त, प्राचार्य, सर्व पदविका संस्था यांना माहीती व अनुपालनार्थ

सह संचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
औरंगाबाद.